**महाराष्ट्र शासन**

**शिक्षण संचालनालय (माध्यमिक व उच्च माध्यमिक) महाराष्ट्र राज्य,**

**मध्यवर्ती इमारत, डॉ. ॲनी बेझंट मार्ग, पुणे-४११००१.**

# जाहीर प्रकटन,

## इयत्ता ११ वी ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया सन २०२५-२६

सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षापासून संपूर्ण राज्यामध्ये इयत्ता ११ वी चे प्रवेश केंद्रीय ऑनलाईन पध्दतीने करण्यात येत आहेत. इयत्ता ११ वी ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेच्या नियमित फेरी एक व दोन मध्ये ७२०६६६ विद्यार्थ्यांनी आपला प्रवेश कनिष्ठ महाविद्यालयात निश्चित केलेला आहे. इयत्ता ११ वी ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेसाठी एकूण १४२९२३४ विद्यार्थ्यांनी केलेली आहे.

नियमित फेरी तीनसाठी नविन नोंदणी १३६२१ विद्यार्थ्यांनी केलेली आहे. कॅप प्रवेशासाठी ४१०४९८ विद्यार्थ्यांनी अर्जाचा भाग दोन (कनिष्ठ महाविद्यालयांचे पसंतीक्रम) दिलेले आहेत तसेच ८२९५२ विद्यार्थ्यांनी अर्जाचा भाग दोन (कनिष्ठ महाविद्यालयांचे पसंतीक्रम) कोटा अंतर्गत (अल्पसंख्यांक, इन-हाऊस, व्यवस्थापन) प्रवेशासाठी दिलेले आहेत.

नियमित फेरी तीनमध्ये शाखानिहाय अलॉटमेंट खाली नमूद तक्त्याप्रमाणे:

| **अ.क्र.** | **शाखा** | **अलॉटमेंट झालेल्या विद्यार्थ्यांची संख्या** |
|---|---|---|
| १ | कला | २०९६३ |
| २ | वाणिज्य | ३३५०५ |
| ३ | विज्ञान | ५६७६७ |
| | **एकूण** | **१११२३५** |

नियमित फेरी तीनमध्ये दिनांक २६ जुलै, २०२५ ते दिनांक २८ जुलै, २०२५ ऐवजी **सुधारित दिनांक २५ जुलै, २०२५ ते दिनांक २६ जुलै, २०२५ पर्यंत विद्यार्थी प्रवेश निश्चित करण्यासाठी कालावधी देण्यात आला आहे.**

**नियमित फेरी चार -** दिनांक २८ जुलै २०२५ पासून अर्जाचा भाग –दोन/कनिष्ठ महाविद्यालयांचे प्राधान्यक्रम भरण्यास सुरु होत आहे. त्याचे वेळापत्रक पुढीलप्रमाणे:

**नियमित फेरी – चारचे वेळापत्रक**

| **अ.क्र** | **कालावधी** | **नियमित फेरी - ४ मधील कॅप व कोटाअंतर्गत प्रवेश प्रक्रियेसाठी कार्यवाही** |
|---|---|---|
| १ | २८ जुलै २०२५ सकाळी १०.०० वा ते २९ जुलै २०२५ सायंकाळी ६.३० वा. | नविन नोंदणी, पहिल्या फेरी दरम्यान भरलेल्या भाग-१ मध्ये दुरुस्ती करणे तसेच अद्यावत माहिती भरणे, अर्ज-भाग-१ व २ भरणे, कनिष्ठ महाविद्यालयांचे पसंतीक्रम देणे. (कॅप व कोटा प्रवेश) अर्ज -१ व २ लॉक करणे. |
| २ | ०१ ऑगस्ट, २०२५ ते ०२ ऑगस्ट, २०२५ | विद्यार्थ्यांनी प्रत्यक्ष कनिष्ठ महाविद्यालयात जाऊन आपला प्रवेश निश्चित करणे. (कॅप व कोटा प्रवेश) |

राज्यातील इयत्ता ११ वी चे वर्ग सर्व कनिष्ठ महाविद्यालयांच्या/उच्च माध्यमिक शाळा हया शासन निर्णय दिनांक ०६/०५/२०२५ अन्वये दिनांक ११ ऑगस्ट, २०२५ पूर्वी सुरु करणे आवश्यक आहे. तशा सूचना संचालनालयाच्या दिनांक १९ मे २०२५ रोजीच्या पत्रानुसार सर्व संबंधितांना देण्यात आलेल्या आहेत.

विद्यार्थी/पालक तसेच कनिष्ठ महाविद्यलयातील प्राचार्य यांनी याची नोंद घ्यावी. या बाबीची व्यापक स्वरुपात प्रसिध्दी देण्यात यावी. ही विनंती.

**अधिकृत पोर्टल-** https://mahafyjcadmissions.in

**ई-मेल आयडी** – support@mahafyjcadmissions.in

**हेल्पलाईन नंबर - ८५३०९५५५६४.**

MPalkar

**(डॉ.महेश पालकर)**
शिक्षण संचालक
(माध्यमिक व उच्च माध्यमिक)
शिक्षण संचालनालय, म. रा. पुणे

**स्थळ:** पुणे
**दिनांक:** २४ जुलै, २०२५